महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्र. ०२२-२२०१४४१९
Email : neela.ranade@nic.in

क्र. जीपीडीपी-२०१८/प्र.क्र.५१/पंरा- ६
ग्राम विकास विभाग,
बांधकाम भवन, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दिनांक :- ०७ सप्टेंबर, २०१८.

प्रति,

१. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव ( वित्त / नियोजन /ग्राम विकास / जलसंधारण / जलसंपदा/ महसूल व वन / महिला व बाल विकास /आदिवासी विकास / सामाजिक न्याय / सार्वजनिक आरोग्य / पाणी पुरवठा /सार्वजनिक बांधकाम /शालेय शिक्षण/ कृषी व पदुम / गृह / उर्जा)
२. विभागीय आयुक्त ( सर्व विभाग )
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ( सर्व )
४. जिल्हाधिकारी ( सर्व )
५. राज्य प्रकल्प संचालक, राज्य प्रकल्प व्यवस्थापक कक्ष ( राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान), ए-९, शिवसागर अपार्टमेंट, मोदीबाग, गणेशखिंड रोड, शिवाजीनगर, पुणे - ४११०१६.
६. माहिती व तंत्रज्ञान कक्ष, ग्रामविकास विभाग, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई.
७. सह सचिव / उप सचिव ग्राम विकास विभाग ( सर्व )
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, एम.एस.आर.एल.एम., ५ वा मजला, साऊथ विंग, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.
९. संचालक, राज्य ग्रामविकास संस्था, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे ४११ ००७.

विषय - "सबकी योजना सबका विकास" - People's Plan Campaign for Gram Panchayat Development Plan (GPDP) - मोहीम राबविणेबाबत
(२ ऑक्टोबर, २०१८ ते ३१ डिसेंबर, २०१८)

संदर्भ - मा.सचिव, पंचायती राज मंत्रालय, भारत सरकार यांचे अ.शा.पत्र क्र. K-१४०१६/०२/२०१८-PC, दि. १३/०८/२०१८

महोदय,

केंद्र शासनाच्या ग्राम विकास व पंचायती राज मंत्रालयाने "सबकी योजना सबका विकास" लोकसहभागातून लोकांचा ग्रामपंचायत विकास आराखडा ही मोहीम दिनांक २ ऑक्टोबर, २०१८ ते ३१ डिसेंबर, २०१८ या कालावधीत राबविणेचे निश्चित केलेले आहे. या मोहीमे अंतर्गत राज्य शासनाचे विविध विभागांचा सहभाग, विविध विभागांमार्फत ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये राबविण्यात येत असलेल्या केंद्र व राज्य शासनाच्या विकास योजनांचे अभिसरण करून सन २०१९-२० चा ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करावयाचा आहे.

सन २०१९-२० चा ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करणेबाबत राज्य शासनाच्या ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र. जीपीडीपी-२०१८/प्र.क्र.५१/पंरा- ६ दि.०६.०९.२०१८अन्वये सविस्तर

सूचना निर्गमित करणेत आलेल्या आहेत. या सूचनांच्या अंमलबजावणी बरोबरच केंद्र शासनाच्या "सबकी योजना सबका विकास" या मोहीमेचा विचार करून ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करण्याची प्रक्रिया व वेळापत्रकाची सांगड मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घालावयाची आहे. "सबकी योजना सबका विकास" या मोहीमे अंतर्गत ७३ व्या राज्य घटना दुरूस्ती अन्वये अनुसूची ११ मध्ये नमुद केलेल्या २९ विषयांची जबाबदारी पंचायतराज संस्थांकडे सोपविण्यात आलेली असल्यामुळे या सर्व २९ विषयांशी संबंधीत राज्य शासनाचे विभागांनी ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होणे अपेक्षित आहे. "सबकी योजना सबका विकास" या मोहीमेच्या मार्गदर्शक सूचना सोबत जोडल्या आहेत. या मोहीमे अंतर्गत राज्य व जिल्हा स्तरावर विविध विभागांची जबाबदारी व वेळापत्रक खालीलप्रमाणे राहील.

१) ग्राम विकास विभाग

| | |
|---|---|
| १. राज्य स्तरावर "सबकी योजना सबका विकास" मोहीमेसाठी, मिशन अंत्योदय अंतर्गत पायाभुत सर्वेक्षण आणि माहिती तंत्रज्ञान संबंधीत कामासाठी राज्य, जिल्हा व तालुका स्तरावरील नोडल अधिकारी नियुक्त करणे. | दि. १० सप्टेंबर, २०१८ |
| २. राज्य घटनेच्या अनुसूची ११ मध्ये नमुद २९ विषयाशी संबंधीत विभागांनी राज्य स्तरीय नोडल अधिकारी नियुक्त करणे. | दि. १० सप्टेंबर, २०१८ |
| ३. राज्य स्तरावर सर्व संबंधीत विभागांची बैठक घेणे | दि. १० सप्टेंबर, २०१८ |

या सर्व नोडल अधिका-यांनी www.gpdp.nic.in या वेब पोर्टलवर नोंदणी करावयाची आहे.

२) राज्य शासनाचे विविध विभागाचे नोडल अधिकारी

| | |
|---|---|
| १. राज्य घटनेच्या अनुसूची ११ मध्ये नमुद २९ विषयाशी संबंधीत विभागांच्या नोडल अधिका-यांनी ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करण्यासाठी आयोजित करण्यात येणा-या दिनांक २ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर, २०१८ या कालावधीतील प्रत्येक ग्रामपंचायतीच्या विशेष ग्राम सभांना उपस्थित राहणा-या ग्राम / तालुका स्तरीय वा अन्य अधिकारी / कर्मचा-यांची नियुक्ती करणे व त्यांची नावे वेब पोर्टलवर अपलोड करणे. | दि. १० सप्टेंबर, २०१८ |
| २. नियुक्त केलेल्या या अधिकारी कर्मचा-यांनी त्यांना नेमुन दिलेल्या ग्रामपंचायतींच्या ग्राम सभांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार उपस्थित राहणेबाबत सूचना देणे. | दि. १० सप्टेंबर, २०१८ |
| ३. ग्राम सभेमध्ये संबंधीत विभागा मार्फत अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती, | संबंधीत ग्रामपंचायतीची विशेष ग्राम सभा (२ ऑक्टोबर ते ३१ |

| | |
|---|---|
| सन २०१८-१९ मध्ये त्या गावामध्ये हाती घेतलेले उपक्रम / कार्यक्रम, त्यांची भौतिक व आर्थिक सध्यस्थिती आणि सन २०१९-२० या वर्षी प्रस्तावित केलेले उपक्रम / कार्यक्रम, त्यासाठी केलेली तरतूद इ. माहिती लेखी स्वरूपामध्ये ग्रामपंचायतीस व ग्राम सभेस देणेबाबत सूचना देणे. | डिसेंबर, २०१८) |

3) राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान, पुणे

| | |
|---|---|
| १. सन २०१९-२० या वर्षाचा ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करणेबाबतच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे. | दि. १० सप्टेंबर, २०१८ |
| २. या मोहिमेसाठी राज्य स्तरावर नोडल अधिकारी म्हणून काम पाहणे. | |
| ३. ग्रामपंचायत विकास आराखड्यासाठी विशेष ग्रामसभांचे वेळापत्रक मुख्य कार्यकारी अधिका-या मार्फत निश्चित करणे. | दि. १० सप्टेंबर, २०१८ |
| ४. या विशेष ग्रामसभांपूर्वी राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत *प्रस्तावित* असलेल्या दोन ग्रामस्तरीय कार्यशाळांचे नियोजन व वेळापत्रक मुख्य कार्यकारी अधिका-या मार्फत निश्चित करून अंमलात आणणे. त्यासाठी आवश्यक असलेल्या प्रविण प्रशिक्षकांचे प्रशिक्षण मुदतीत राज्य ग्रामीण विकास संस्थेच्या मदतीने पूर्ण करून घेणे. | दि. १० सप्टेंबर, २०१८ |
| ५. ग्रामपंचायत विकास आराखडे विहित मुदतीत तयार करून अंतीम करण्याच्या दृष्टीने सनियंत्रण करणे. | सप्टेंबर ते डिसेंबर, २०१८ |

४) राज्य ग्रामीण विकास संस्था, यशदा, पुणे

| | |
|---|---|
| १. ग्रामपंचायत विकास आराखड्यासाठी आयोजित करावयाच्या ग्रामसभेपूर्वी ग्रामस्तरावर घ्यावयाच्या दोन कार्यशाळेच्या प्रविण प्रशिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यातील प्रत्येक विषयाचे तीन याप्रमाणे एकूण २०४ प्रमुख प्रविण प्रशिक्षकांना प्रशिक्षित करणे. | दि. १५ सप्टेंबर, २०१८ |
| २. महाराष्ट्र ग्रामीण जिवनोन्नती अभियान (MSRLM) मार्फत नियुक्त केलेल्या Facilitator च्या प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण मोड्यूल तयार करणे. | दि. १० सप्टेंबर, २०१८ |
| ३. ग्रामपंचायत विकास आराखडा (GPDP) अंतर्गत प्रशिक्षण कार्यक्रमासाठी नोडल अधिकारी म्हणून काम पाहणे. | |

५) माहिती तंत्रज्ञान कक्ष, ग्राम विकास विभाग

| | |
|---|---|
| १. वेब पोर्टलवर नोंदणी, जिओ-टॅगिंग फोटोग्राफ आणि प्लॅन प्लस वरील नोंदी यासाठी राज्य स्तरावर नोडल अधिकारी म्हणून काम पाहणे. त्याचप्रमाणे यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर नोडल अधिका-यांची नियुक्ती करणे. | दि. १० सप्टेंबर, २०१८ |
| २. ग्रामसभा बैठकीचे जिओ-टॅग फोटोग्राफ अपलोड करणेबाबत सनियंत्रण करणे | दि. २ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर, २०१८ |
| ३. ग्रामपंचायत विकास आराखड्यांचे प्लॅन प्लस वर अपलोड करणेबाबत सनियंत्रण करणे. | दि. २ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर, २०१८ |
| ४. केंद्र शासनाने ग्रामपंचायतीसाठी विकसीत केलेल्या विविध आज्ञावली (www.gpdp.nic.in) अद्ययावत ठेवणेबाबत सनियंत्रण करणे. | दि. २ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर, २०१८ |

६) महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई

| | |
|---|---|
| १. मिशन अंत्योदय अंतर्गत पायाभुत सर्वेक्षण, ग्रामपंचायतनिहाय Facilitator च्या नियुक्त्या, Facilitator चे प्रशिक्षण यासाठी राज्य स्तरावर नोडल अधिकारी म्हणून काम पाहणे. त्याचप्रमाणे यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर नोडल अधिका-यांची नियुक्ती करणे. | दि. १० सप्टेंबर, २०१८ |
| २. सर्व ग्रामपंचायतीसाठी Facilitator ची नियुक्ती करणे. | दि. १० सप्टेंबर, २०१८ |
| ३. नियुक्त केलेल्या Facilitator चे प्रशिक्षण पूर्ण करणे. त्यासाठी राज्य ग्रामीण विकास संस्थेकडून प्रशिक्षण मोड्यल प्राप्त करून घेणे. | दि. १५ सप्टेंबर, २०१८ |
| ४. Facilitator मार्फत बेसलाईन सर्वे पूर्ण करून घेणे (MA Mobile App), data upload करणे, Poverty Reduction Plan तयार करून ग्रामसभेत मांडणे तसेच ग्रामसभेमध्ये अनु.जाती-जमाती, महिला, अपंग इ. वंचीत घटकांचा सहभाग करून घेणे आणि विहित नमुन्यातील अहवाल सादर करणे या सर्व कामकाजाचे सनियंत्रण करणे. | सप्टेंबर ते डिसेंबर, २०१८ |
| ५. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निश्चित केलेले ग्रामसभांचे वेळापत्रक आणि Facilitators च्या नियुक्त्या, प्रशिक्षण व सर्वेक्षण याबाबींची सांगड घालणे. ग्रामसभेमध्ये Facilitator ने सक्रियपणे सर्व जबाबदा-या पार पाडणेबाबत सनियंत्रण करणे. | |

७) विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व विभाग)

| | |
|---|---|
| १. "सबकी योजना सबका विकास" या मोहीमेच्या अंमलबजावणीचा वेळोवेळी आढावा घेणे. | |
| २. "सबकी योजना सबका विकास" या मोहीमेचे सनियंत्रण करणे. | |

८) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

| | |
|---|---|
| १. "सबकी योजना सबका विकास" या मोहीमेच्या अंमलबजावणीची जिल्हास्तरावरील संपूर्ण जबाबदारी पार पाडणे. | |
| २. सन् २०१९-२० चा ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करणेबाबतच्या निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना व या मोहीमेची सांगड घालून अंमलबजावणी करणे. | |
| ३. जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये ग्रामपंचायत विकास आराखडा निश्चित करण्यासाठी २ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर, २०१८ या कालावधीमध्ये विशेष ग्रामसभांचे आयोजन करणे. | दि. १० सप्टेंबर, २०१८ |
| ४. या विशेष ग्रामसभांच्या आधी प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानामध्ये *प्रस्तावित* केलेल्या दोन कार्यशाळांचे नियोजन करणे. | दि. १० सप्टेंबर, २०१८ |
| ५. या दोन कार्यशाळा व विशेष ग्रामसभेचे ग्रामपंचायतनिहाय वेळापत्रक निश्चित करून त्यास स्थानिक स्तरावर प्रसिध्दी देणे. | दि. १० सप्टेंबर, २०१८ |
| ६. या विशेष ग्रामसभेसाठी जिल्हा परिषदेसह राज्य शासनाच्या विविध विभागांचे अधिकारी / कर्मचारी उपस्थित राहणे अपेक्षित असल्याने, तालुक्यामध्ये एका दिवशी जास्तीतजास्त दोन ग्रामसभा आयोजित करणे. | |
| ७. मुख्य कार्यकारी धिका-यांनी जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद व राज्य शासनाच्या विविध विभागाच्या जिल्हास्तरीय अधिका-यांची बैठक घेवून सदर मोहीम व ग्रामपंचायत विकास आराखड्याबाबत आवश्यक त्या सूचना द्याव्यात व सर्व खात्यांचा समन्वय साधणे. | दि. १० सप्टेंबर, २०१८ |
| ८. विशेष ग्रामसभेसाठी सर्व विभागांचे, विशेषत: राज्य शासनाच्या विभागाकडील संबंधीत अधिकारी कर्मचारी उपस्थित राहून मोहीमेअंतर्गत सोपविलेली जबाबदारी पार पाडण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करणे. | |
| ९. प्रत्येक ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेसाठी तालुकास्तरीय | दि. १० सप्टेंबर, २०१८ |

विस्तार अधिका-यांची संपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती करणे.

१० या मोहीमे अंतर्गत नियुक्त करण्यात येणारे Facilitator, त्यांचे प्रशिक्षण, सर्वेक्षण तसेच RGSA अंतर्गत दोन ग्रामस्तरीय कार्यशाळांसाठी नियुक्त करावयाचे प्रविण प्रशिक्षक यांचे प्रशिक्षण इ. बाबींचे पर्यवेक्षण व सनियंत्रण करणे.

११ जिल्हा स्तरीय नोडल अधिका-यांचा नियमित आढावा घेवून जिल्ह्यामध्ये मोहीम यशस्वी करणे.

१२ या मोहिमेविषयी विहित अहवाल राज्य स्तरीय नोडल अधिका-यांकडे सादर करणे.

१३ ग्रामपंचायतीमध्ये विहित नमुन्यातील २०X१० स्के.फू या आकाराचे फलक लावणे.

१४ केंद्र शासनाच्या वेब साईटवरील डेटा एंट्री नियमित स्वरूपात करून वेबसाईट अपडेट ठेवणे.

आपली,

( नीला रानडे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

निवड नस्ती (कार्यासन पंरा-६)